बीड । महाराष्ट्र
शुक्रवार दि. ६ मार्च २०२६
वर्ष ५ वे । अंक ३३३
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com










## केज नगरपंचायत मधील...

# 3.67 कोटींचा घरकुल घोटाळा विधानसभेत गाजला

**मुंबई । प्रतिनिधी**

केज नगरपंचायतीत २०२१-२२ या कालावधीत पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत (अर्बन) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आलेल्या निधीचा मोठा अपहार झाल्याचे समोर आले आहे. आमदार नमिता मुंदडा यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे हा प्रश्न उपस्थित केला असून, या प्रकरणात तब्बल ३.६७ कोटी रुपयांचा निधी नियमबाह्य पद्धतीने कंत्राटदार आणि कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक खात्यावर वर्ग केल्याचे उघड झाले आहे. लेखापाल आणि महाडाच्या ऑडिट रिपोर्टमधून हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, यामुळे प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

- दोषींवर फौजदारी कारवाईचे संकेत
- आ.नमिता मुंदडा यांची लक्षवेधी
- आठ दिवसात अहवाल सादर करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

आमदार नमिता मुंदडा यांनी विधानसभेत या प्रकरणाची सविस्तर माहिती दिली. पंतप्रधान आवास योजनेचा निधी लाभार्थ्यांच्या खात्यात थेट लाभ हस्तांतरण द्वारे जमा होणे कायदेशीररीत्या बंधनकारक आहे. मात्र, तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांनी आणि संबंधित कर्मचाऱ्यांनी संगनमताने हा निधी अन्य कामांसाठी वळवला आणि स्वतःच्या फायद्यासाठी त्याचा वापर केला. विशेष म्हणजे, या गैरव्यवहाराशी संबंधित अनेक फाईल्स, बिले आणि पेमेंट रेकॉर्ड्स सध्या गहाळ असल्याचे ऑडिट रिपोर्टमध्ये नमूद करण्यात आले आहे. हा केवळ आर्थिक भ्रष्टाचार नसून शासनाच्या धोरणांचे आणि नियमांचे गंभीर उल्लंघन असल्याचे मुंदडा यांनी स्पष्ट केले. या प्रश्नाला उत्तर देताना राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले की, केजमध्ये ३७४ लाभार्थ्यांपैकी अनेक पात्र लाभार्थ्यांना घराचा निधी मिळाला नाही, ही वस्तुस्थिती आहे. नियमानुसार हा निधी राष्ट्रीयकृत बँकेत ठेवणे आवश्यक असताना तो एका ग्रामीण बँकेत जमा करण्यात आला, ही पहिली मोठी चूक होती. या गंभीर प्रकरणाची आता सखोल विभागीय चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले असून, यात आर्थिक गुन्हे शाखेलाही सहभागी करून घेतले जाणार आहे. बँकेतील व्यवहारांची तपासणी करून यातील प्रत्येक पैशाचा हिशोब घेतला जाईल. राज्यमंत्री मिसाळ यांनी ▶▶पान २ वर



## पवनचक्कीवर दरोडा टाकणाऱ्या

# टोळीला ठोकल्या बेड्या



**पाटोदा । प्रतिनिधी**

तालुक्यातील येवलवाडी शिवारात असलेल्या पवनचक्कीवर दरोडा टाकून केबल व साहित्य चोरणाऱ्या अट्टल टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे. दोन आरोपींना अटक करण्यात आली असून दोघे फरार आहेत. पोलीस ठाणे पाटोदा हद्दीतील येवलवाडी येथील शिवारात रिनिव्ह पॉवर कंपनीने उभारलेल्या पवनचक्कीवर सौरभ बाबुराव येवले (वय २२) व शुभम बबन सॉडगे हे वॉचमन म्हणून कार्यरत आहेत. दि.२५ फेब्रुवारी रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी त्यांना मारहाण करून पवनचक्कीतील केबल व इतर ▶▶पान २ वर

# गेवराईत कारची समोरासमोर धडक

**गेवराई । प्रतिनिधी**

**एक ठार**

शहरातील नवीन बसस्थानकाजवळील शारदा हॉस्पिटलसमोरील रस्त्यावर मंगळवार, ३ फेब्रुवारी रोजी रात्री सुमारे साडेआठ वाजण्याच्या सुमारास दोन कारची समोरासमोर भीषण धडक होऊन संतोष अंकुशराव पाचपुते (रा. गेवराई) या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे. नवीन बसस्थानकाकडून येणारी एक कार आणि समोरून येणारी दुसरी कार (क्र. एमएच १२ बीपी ६९३९ व एमएच १४ जेए ३६४६) यांच्यात जोरदार टक्कर झाली. धडक इतकी भीषण होती की दोन्ही वाहनांचा पुढील भाग पूर्णपणे चुराडा झाला. एका वाहनाचा बंपर व इंजिनचा भाग रस्त्यावर विखुरलेला दिसून आला. अपघातानंतर काही काळ वाहतूक ठप्प झाली होती.घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र संतोष पाचपुते यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. ▶▶पान २ वर

# राजाभाऊ फडचे डोके ठिकाणावर आहे का?

**परळी । प्रतिनिधी**

## धनंजय मुंडे समर्थकांची परळीत पत्रकार परिषद

स्व. महादेव मुंडे यांच्या हत्या प्रकरणात बीड जिल्ह्याबाहेरील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्फत चौकशी सुरू असून, काही जणांच्या ब्रेन मॅपिंग व नार्को टेस्ट केल्या जात असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले होते. हे अहवाल अत्यंत गोपनीय ठेवले जातात, असा तपास प्रक्रियेचा प्रघात आहे. मात्र या अहवालांमधून माझ्याकडे काहीतरी कानात सांगितलेली माहिती आहे, असा दावा करून शरद पवार गटाचे राजाभाऊ फड यांनी थेट आ. धनंजय मुंडे साहेबांचे नाव घेणे हे संतापजनक असून याचा उद्देश धनंजय मुंडे साहेबांची बदनामी करण्यापुरता मर्यादित नसून गृह विभागाच्या तपासातील कार्य पद्धतीवर संशय निर्माण करणारे असल्याचे मत धनंजय मुंडे यांच्या सहकाऱ्यांनी एका संयुक्त पत्रकार परिषदेत व्यक्त केले आहे. आज सकाळी शरद पवार गटाचे राजाभाऊ फड यांनी एक पत्रकार परिषद घेऊन तोंडाला येतील ते आरोप करत स्व. महादेव मुंडे यांच्या हत्याप्रकरणी थेट धनंजय मुंडे यांचे नाव घेऊन सनसनाटी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर परळी शहरातील जगमित्र कार्यालयात धनंजय मुंडे यांच्या सहकाऱ्यांनी एक संयुक पत्रकार परिषद घेत राजाभाऊ फड यांच्या खोट्या आरोपांचा बुरखा फाडला. स्व. महादेव मुंडे यांची हत्या ही एक दुर्दैवी घटना होती. त्यात संबंधित कुटुंबियांनी मागणी केलेल्या अधिकाऱ्यांच्या मार्फत चौकशी सुरू आहे. काही संशयितांच्या ब्रेन मॅपिंग व नार्को टेस्ट केल्याचे प्रसार माध्यमांच्या माध्यमातून समोर आले. मात्र संबंधित टेस्टचे अहवाल हे गोपनीय ठेवले जातात व ठराविक वेळी ते ▶▶पान २ वर

# आंतरजिल्हा दुचाकी चोरट्यांच्या टोळीचा पर्दाफाश, २५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**गेवराई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गेवराई पोलिसांनी वाहन चोरीच्या गुन्ह्यांविरुद्ध मोठी मोहीम राबवत आंतरजिल्हा दुचाकी चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. या धडक कारवाईत पोलिसांनी तीन अट्टल आरोपींना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून १७ संपूर्ण मोटारसायकली, १६ सांगाडे आणि ३० इंजिन असा एकूण २५ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई पोलीस ठाण्याचे निरीक्षक किशोर पवार आणि त्यांच्या विशेष पथकाने ही यशस्वी कामगिरी केली. गेल्या दोन महिन्यांपासून गेवराई शहर व परिसरात दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. या गुन्ह्यांचा छडा लावण्यासाठी पोलिसांनी परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेजची कसून



तपासणी केली आणि संशयितांवर पाळत ठेवली होती. ५ मार्च २०२६ रोजी पोलिसांनी अचूक सापळा रचून तीन संशयितांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये छत्रपती संभाजीनगर येथील गॅरेज चालक सय्यद अब्रार सय्यद जैनुद्दीन (३१), बीड येथील सय्यद इमदाद हुसैन (२२) आणि नेकनूर येथील भंगार विक्रेता शेख आसेम शेख मझर (३२) यांचा समावेश आहे. यातील एक आरोपी अद्याप फरार असून ▶▶पान २ वर

## लाइनमनला मारहाण प्रकरणी

# राजू कोळेकरांची निर्दोष मुक्तता

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस स्टेशन गेवराई येथे गुन्हा रजि. नं. २९२/२०२२ अन्वये दिनांक २२.०५.२०२२ रोजी भारतीय दंड संहितेच्या कलम ३५३, ३३२, ५०४ व ५०६ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला होता. फिर्यादीच्या तक्रारीनुसार, शासकीय कर्तव्य बजावत असताना लाइनमन यांना मारहाण करून सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याचा आरोप आरोपी राजू कोळेकर यांच्यावर ठेवण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण करून तपासी अधिकाऱ्यांनी दिनांक २१.१०.२०२२ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. त्यानंतर प्रकरणाचे स्वरूप विचारात घेऊन खटला सत्र न्यायालयात कमिट करण्यात आला. सत्र खटल्यादरम्यान सरकार पक्षाने ▶▶पान २ वर



# मंत्री संजय राठोड यांचा बीड दौरा



**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड बीड जिल्ह्याच्या दोऱ्यावर येत आहेत, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे. दिनांक ०७ मार्च, २०२६ रोजी सकाळी १०.०० वा.हेलिकॉप्टरने तीर्थक्षेत्र रामराव महाराज गड हेलिपॅड, काठोडा, तालूका गेवराई, जि. ▶▶पान २ वर

## संपादकीय

# महायुद्धाचा भयंकर खर्च

अमेरिकेने इस्रायलच्या सहकार्याने इराणविरुद्ध २८ फेब्रुवारी २०२६ रोजी 'ऑपरेशन एपिक फ्युरी' ही मोठी लष्करी मोहीम सुरू केली. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी हे युद्ध ४ ते ५ आठवडे किंवा त्यापेक्षा जास्त काळ चालू शकते असे संकेत दिले आहेत. या युद्धाचा अमेरिकन करदात्यांवर आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर भयानक परिणाम होणार आहे. अमेरिकेच्या 'सेंट्रल कमांड'नुसार या मोहिमेत आतापर्यंत इराणमधील १ हजारपेक्षा जास्त लष्करी लक्ष्यांवर हल्ले करण्यात आले आहेत. या मोहिमेत अमेरिकेने बी-२ स्टेल्थ बॉम्बर, एफ-३५, एफ-२२ रॅप्टर आणि टॉमहॉक क्रूझ क्षेपणास्त्रांसारख्या महागड्या शस्त्रप्रणालींचा वापर केला आहे. या अवाढव्य लष्करी ताफ्यामुळे खर्चाचा आकडा वेगाने वाढत आहे. प्रत्यक्ष युद्ध सुरू होण्यापूर्वीच लष्करी ताफ्याच्या हालचालीसाठी ६३० दशलक्ष डॉलर्स खर्च झाले. एका वृत्तसंस्थेच्या मते ऑपरेशनच्या पहिल्याच दिवशी अमेरिकेने सुमारे ६४०० कोटी रुपये खर्च केले. हा खर्च २०२६ च्या एकूण संरक्षण बजेटच्या ०.१ टक्के इतका आहे. पर्शियन गल्फमध्ये दोन विमानवाहू युद्धनौका तैनात आहेत. एका युद्धनौकेचा रोजचा खर्च ६.५ दशलक्ष डॉलर्स आहे. म्हणजे दोन्ही नौकांसाठी दररोज १३ दशलक्ष डॉलर्स खर्च होत आहेत. या युद्धाचा अमेरिकेवर होणारा थेट लष्करी भार ४० ते ९५ अब्ज डॉलर्सच्या दरम्यान असू शकतो. केवळ लष्करी खर्चच नाही, तर अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला होणारे एकूण नुकसान ११५ अब्ज ते २१० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. अमेरिकेचे सरकारी खर्च आधीच जीडीपीच्या १२२.८ टक्क्यांवर पोहोचले असताना, हे युद्ध अमेरिकेची आर्थिक स्थिती अधिक बिकट करू शकते. या युद्धाचा सर्वांत मोठा आणि तातडीचा परिणाम जागतिक ऊर्जा बाजारावर झाला आहे. इराणने 'होर्मुझची सामुद्रधुनी' बंद केल्याने कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. ब्रेंट क्रूड तेलाचे दर प्रति बॅरल ८०.८९ डॉलर्सवर पोहोचले आहेत. जर संघर्ष लांबला तर हा दर १५० डॉलर्सपर्यंत जाऊ शकतो. सौदी अरेबियातील सर्वांत मोठ्या तेल शुद्धीकरण प्रकल्पावर झालेला ड्रोन हल्ला आणि होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे डिझेलच्या किमतीत ८.३ टक्के आणि गॅसोलीनच्या किमतीत ३.८ टक्क्यांची वाढ झाली आहे. इंधनाच्या वाढत्या किमती, जहाजांचा वाढलेला विमा खर्च आणि लष्करी साहित्याचा अफाट वापर यामुळे अमेरिकेला हे युद्ध अत्यंत महाग पडणार हे स्पष्ट आहे. जगातील बड्या खासगी तेल शुद्धीकरण कंपन्यांपैकी एक असलेल्या सौदी अरेबियातील अरामको रिफायनरी या कंपनीवर इराणने ड्रोन हल्ला केला. त्यात कंपनीत आग लागल्याने तेल पुरवठा ठप्प झाला आहे. याचा परिणाम अनेक देशांवर होणार आहे. हीच अरामको कंपनी रत्नागिरी जिल्ह्यातील बारसू किंवा सोयगाव येथे तेल शुद्धीकरण प्रकल्प उभारणार आहे. प्रथम हा प्रकल्प नाणार येथे उभारण्यात येत होता. मात्र स्थानिकांच्या विरोधामुळे हा प्रकल्प नाणारमधून हलवण्यात आला. त्यानंतर तो बारसूला हलवण्याचा निर्णय झाला. तेथेही कडाडून विरोध झाला. इराण दोन दिवसांत शरणागती पत्करेल असा अमेरिकेचा अंदाज होता पण युद्ध सुरू होऊन चार दिवस झाले तरी इराणने माघार घेतली नाही. उलट चीन, ब्रिटन आणि स्पेनने इराणला पाठिंबा जाहीर केला आहे. आमच्या हवाई हद्दीतून जायचे नाही, असे स्पेनने अमेरिकेला बजावले आहे. त्यामुळे हे युद्ध दीर्घकाळ सुरू राहणार हे स्पष्ट आहे. याचा थेट परिणाम तेलाच्या पुरवठ्यावर होणार आहे. तेलाचे भाव वाढत आहेत. भारताला तेलपुरवठ्याची अडचण निर्माण झाली असून आता पुन्हा रशियाकडून तेल घ्यावे काय यावर विचार करावा लागणार आहे. आता अमेरिकाही कोंडीत सापडला आहे. इस्रायलच्या मदतीसाठी अमेरिकेने सौदी अरेबियात अनेक ठिकाणी हवाई आणि नौदल तळ उभारून तेथे लढाऊ विमाने आणि जहाजे आणून ठेवली होती. मात्र इराणने त्यावरच हल्ले करून अमेरिकेचे तळ उद्ध्वस्त केले आहेत. आपले तळ उद्ध्वस्त झाल्याने इराणवर हल्ला करण्यासाठी शस्त्रास्त्रे नाहीत हे ट्रम्प यांनी कबूल केले आहे. अमेरिकन तळांवर इराणने केलेले हल्ले इतके ताकदवान होते की, अखेर अमेरिकेला तेथील सैनिकांना माघारी बोलवावे लागले. जॉर्डन, बहारीन येथील अमेरिकी दूतावासावर हल्ले झाल्याने अमेरिकेने तेथील अधिका-यांना परतण्यास सांगितले. कितीही दिवस लढावे लागले तरी आम्हालाच यश मिळेल आणि त्यामुळे जग सुरक्षित होईल असे अमेरिकेने म्हटले आहे. इराणचे सर्वोच्च नेते खोमेनी यांना ठार मारल्याचा बदला घेण्यासाठी इराणने पवित्र जेरूसलेम शहरावरही विध्वंसक हल्ला केला. यहुदी, मुस्लिम आणि ख्रिश्चनांसाठी जेरूसलेम हे पवित्र शहर आहे. इराण आक्रमण करीत असताना इस्रायलनेही इराणवर हल्ले सुरूच ठेवले. इस्रायलने ओमान खाडीत ११ इराणी जहाजे नष्ट केली. नतांज अणुकेंद्रावर पुन्हा हल्ला केला. हिजबुल्लाहचा गड असलेल्या बैरूतवर क्षेपणास्त्रे डागली. तेहरान शहरातील प्रशासकीय व रहिवासी इमारती उद्ध्वस्त झाल्या आहेत. दरम्यान,भारताने वेगवान हालचाली करत दुबई व इतर राष्ट्रांत अडकलेल्या पर्यटकांना सुखरूप मायदेशी आणण्यासाठी एअर इंडिया, इंडिगो, स्टार अलायन्सची विमाने पाठवली. या पर्यटकांचे भारतात आगमन सुरू झाले आहे. आखाती प्रदेशात सुमारे १ लाख भारतीय आहेत. जागतिक बाजारपेठेतील अनिश्चितता आणि आखाती देशांमधील वाढत्या युद्धजन्य परिस्थितीमुळे सोन्याच्या किमतीत अभूतपूर्व वाढ होताना दिसत आहे. भारतात सोन्याचा भाव दोन लाखाच्या वर जाईल असा अंदाज आहे. युद्ध परिस्थिती अधिकच चिघळली तर सोने दोन लाख पार जाताना दिसू शकेल. राजकीय तणावामुळे गुंतवणूकदार शेअर बाजाराऐवजी सोन्याला सुरक्षित मानत आहेत. जगातील विविध देशांच्या मध्यवर्ती बँका मोठ्या प्रमाणात सोन्याचा साठा करत आहेत. त्यामुळे पुरवठा कमी आणि मागणी जास्त अशी स्थिती निर्माण झाली आहे. अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपयाची होत असलेली घसरण भारतीय ग्राहकांसाठी सोने अधिक महाग करत आहे.

# माजलगावच्या सोनार लुटणाऱ्या टोळीवर मिनी मोक्का

## पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांची मोठी कारवाई


**बीड ।** प्रतिनिधी



जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिवसाढवळ्या सोनाराची लूट करणाऱ्या टोळीवर 'मिनी मोक्का' लावून गुन्हेगारांना मोठा दणका दिला आहे. २५ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या या धाडसी चोरीचा तपास लावत पोलिसांनी टोळीप्रमुखासह चौघांना अटक केली असून त्यांच्याकडून लाखो रुपयांचे दागिने जप्त केले आहेत. नवीन भारतीय न्याय संहितेच्या कलम १११ (संघटित गुन्हेगारी) अंतर्गत करण्यात आलेली ही जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण कारवाई ठरली आहे. माजलगाव येथील मजरंत रोडवर राहणारे सोनार अमोल पंढरीनाथ गायके हे २५ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता आपल्या पुतण्यासह सोन्या-चांदीचे दागिने पिशवीत घेऊन आठवडी बाजाराला जात होते. गढी रोडवर मोटारसायकलवरून आलेल्या तीन अज्ञात चोरट्यांनी त्यांचा पाठलाग केला आणि सत्तूरचा धाक दाखवून ५९ लाख ३३ हजार ५८० रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने जबरदस्तीने लुटून नेले होते. या घटनेनंतर पीडित सोनाराने दिलेल्या फिर्यादीवरून माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गंभीर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक बालक कोळी आणि सपोनि पांडव यांच्या मार्गदर्शनाखाली वेगाने सुरू करण्यात आला. तपासादरम्यान पोलिसांनी तांत्रिक बाबी आणि गोपनीय माहितीच्या आधारे पाच आरोपींची टोळी निष्पन्न केली, ज्यापैकी चौघांना अटक करण्यात यश आले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये टोळीप्रमुख कृष्णा तुकाराम निरडे (वय २२, रा. पावरहाऊस रोड, माजलगाव), अभिषेक अशोक शिंदे (वय २२, रा. माजलगाव), एकनाथ अरुण कपाले (वय ३५, रा. शाहूनगर, बीड) आणि संजीव ऊर्फ संजय विष्णुदास कांबळे (वय २८, रा. उदगीर, जि. लातूर) यांचा समावेश आहे. पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून २९ लाख २२ हजार ६०० रुपयांचे दागिने हस्तगत केले असून पाचवा फरार आरोपी अद्याप पोलिसांच्या रडारवर आहे. पोलिस तपासात धक्कादायक माहिती समोर आली की, या टोळीप्रमुख आणि त्याच्या साथीदारांनी जिल्ह्यात संघटितपणे शस्त्रांचा धाक दाखवून आर्थिक फायद्यासाठी एकूण सात गुन्हे केले आहेत. ही संघटित गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी नवीन भारतीय न्याय संहितेनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करत या टोळीवर कलम १११ (संघटित गुन्हेगारी) म्हणजेच 'मिनी मोक्का' लावण्याची परवानगी माजलगाव ग्रामीण पोलिसांना दिली. या कारवाईमुळे गुन्हेगारी वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. सदरची यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, बालक कोळी, सपोनि पांडव आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मिळून केली आहे. भविष्यातही अशाच प्रकारे संघटित गुन्हेगारी करणाऱ्या टोळ्यांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस प्रशासनाने दिले आहेत.

# केज-कळंब रोडवर एसटी बसचा भीषण अपघात; चालक-वाहकासह १३ प्रवासी जखमी





**केज ।** प्रतिनिधी

केज-कळंब मार्गावरील चिंचोली पाटीजवळ आज पहाटे सहाच्या सुमारास उभ्या ट्रकला एसटी बसने जोराची धडक दिल्याने भीषण अपघात झाला. कोल्हापूरहून माजलगावच्या दिशेने जाणारी बस रस्ता ओलांडताना हॉटेल लालपरी जवळ उभ्या असलेल्या ट्रकला धडकली. या अपघातात बस चालक आनंद गायके आणि वाहक विष्णू तांबडे यांच्यासह अकरा प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक जय जोगदंड आणि पोलीस हवालदार राजू वंजारे यांनी तात्काळ मदतीसाठी धाव घेतली. रुग्णवाहिका चालक सुमित तेलंग यांनी सर्व जखमींना तातडीने केज येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. जखमींमध्ये संजय खरात, चैतन खरात, भास्कर गायकवाड, आशा खरात, सचिन खरात, रोशनी खरात, भाग्यश्री गायकवाड, पायल गायकवाड, सुनिता खरात, सचिन सुरवसे आणि वैशाली राऊत यांचा समावेश आहे. प्राथमिक उपचारानंतर सर्व जखमींना पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात हलवण्यात आले आहे. पोलीस उपनिरीक्षक राकेश बनसोडे यांनी अपघातस्थळाची पाहणी केली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

## पान १ वरून

### ३.६७ कोटींचा घरकुल...

सभागृहात ठामपणे सांगितले की, जे अधिकारी आणि कर्मचारी या अपहारात दोषी आढळतील त्यांच्यावर कडक फौजदारी कारवाई केली जाईल. तसेच, संबंधित बँका आणि कर्मचाऱ्यांकडून अपहार केलेली सर्व रक्कम व्याजासह वसूल करण्याची प्रक्रिया तातडीने राबवली जाईल. जिल्हाधिकाऱ्यांना येत्या आठ दिवसांत या प्रकरणाचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असून, अहवाल प्राप्त होताच दोषींना निलंबित करण्यात येईल. गोरगरीब लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध असून कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही, अशी ग्वाही सरकारतर्फे देण्यात आली आहे.

### राजाभाऊ फडचे डोके...

न्यायालयात सादर केले जातात. पण या अहवालांमधून आपल्याकडे काही माहिती लीक झाली असल्याचा दावा जर राजाभाऊ फड करत असतील तर ते गृह विभागाच्या तपासातील कार्य पद्धतीवर संशय निर्माण करणारे तसेच दखलपात्र गुन्हा देखील आहे. त्यामुळे राजाभाऊ फड याला या प्रकरणात आता सहआरोपी करण्यात यावे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. परळीच्या थर्मलला लुटून खाणाऱ्या आणि प्रत्येक विकासाच्या कामात खोडा घालणाऱ्या राजाभाऊ फड याला खरेतर चांगल्या मानसोपचार तज्ज्ञांकडे जाऊन उपचार घेण्याची गरज आहे. किंबहुना राजाभाऊ फड याला त्याच्या निकटवर्तीयांनी चांगल्या मानसोपचार तज्ज्ञांकडे दाखल करावे, आपण त्याचा संपूर्ण खर्च करायला तयार आहोत, अशा शब्दात राजाभाऊ फड यांच्या बेताल वक्तव्याचा समाचार मुंडे समर्थकांनी घेतला. मागील काही महिन्यांपासून आ. धनंजय मुंडे यांना सॉफ्ट टार्गेट ठरवून रोज उठून नवनवीन आरोप करून त्यांना बदनाम करण्याचे एक मोठे षडयंत्र सध्या सुरू आहे. राजाभाऊ फड देखील याच षड्यंत्राचा खालून पहिला प्यादा आहे. पण आता मात्र असे बिनबुडाचे आरोप सहन केले जाणार नाहीत. राजाभाऊ फड यांच्या विरोधात कायदेशीर अब्रुनुकसानीचा फौजदारी खटला दाखल करणार आहोत, असेही यावेळी नमूद करण्यात आले. मुळात राजाभाऊ फड हे एक गुत्तेदार राजकारणी आहेत. प्लॉटिंग वगैरे त्यांचेही अनेक व्यवसाय आहेत. स्थानिक कन्हेरवाडी गावात त्यांचेही स्व. महादेव मुंडे यांच्या सोबत वाद होते, पोलिसांनी राजाभाऊ फड याची चौकशी केली आहे का? राजाभाऊ फडच्या नावाचे थर्मल पासून ते श्री वैद्यनाथ देवस्थानाच्या कामात मोठे दिवे लागलेले आहेत. प्रभू वैद्यनाथ देवस्थानाच्या कामात त्रिशूळ - डमरू असलेले पोल लावायचे कंत्राट घेतले, त्यातले पोल या व्यक्तीने अगदी स्वतःच्या खाजगी पेट्रोल पंपावर बसवले आहेत, हे संपूर्ण परळीच्या जनतेने उघडपणे पाहिले आहे; अशा व्यक्तींची विश्वासार्हता किती आहे, हे माध्यमांनी तपासले पाहिजे. दहा खून केले, अमुक केले, तमुक केले असे तोंडाला येईल ते बोलताना आधी डोके ठिकाणावर आहे का तपासून बघा. ज्या खटल्यांचे निकाल न्यायालयाने देऊन दहा वर्षे उलटली त्या खटल्यात मुंडे साहेबांचे नाव घेणाऱ्या व्यक्तीस चांगल्या डॉक्टरला दाखवा, असा सल्लाही त्यांनी दिला. या पत्रकार परिषदेस ज्येष्ठ नेते प्रा. डॉ. मधुकर आघाव, परळी बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, ड. गोविंद फड, शिवाजी शिरसाट, बालाजी (पिंटू) मुंडे, वैजनाथराव सोळंके, नितीन निर्मळ पाटील, अमर गित्ते पाटील, शंकर कापसे पाटील, सुनील नाना फड, शरद मुंडे, यांसह पदाधिकारी, नगरसेवक आदी उपस्थित होते.

### टोळीला ठोकल्या...

साहित्य चोरून नेले होते. या घटनेप्रकरणी पाटोदा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा बीड व पाटोदा पोलीस करत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त माहिती व तांत्रिक विश्लेषणातून माहिती मिळाली की, मधुकर आबा काळे रा.खामकरवाडी, ता. वाशी, जि. धाराशिव,व बबलू

## पान १ वरून

जालीधर शिंदे रा. दसमेगाव, ता. वाशी, जि. धाराशिव यांनी त्यांच्या साथीदारांसह हा गुन्हा केला असून ते खामकरवाडी शिवारातील एका फटाक्याच्या कारखान्यावर काम करत आहेत.या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून या दोघांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्यांनी अनिल उर्फ शेड्या आबा काळे रा. खामकरवाडी, ता. वाशी - फरार, शिवाजी संजय शिंदे रा. खामकरवाडी, ता. वाशी - फरार व अमोल रमेश शिंदे रा. येरमाळा, ता. कळंब, जि. धाराशिव यांच्या मदतीने पवनचक्कीवरील केबल चोरी करून विक्री केल्याची कबुली दिली. आरोपींकडून २० हजार रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पाटोदा पोलीस करीत आहेत.सदरील कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि श्रीराम खटावकर, सुशांत सुतळे, पोहे सोमनाथ गायकवाड, मारुती कांबळे, राहुल शिंदे, बाळू सानप, आनंद मस्के, अर्जुन यादव, अशपाक सय्यद, मनोज परजणे, विकी सुरवसे यांनी केली.

### मंत्री संजय राठोड...

बीडकडे प्रयाण. सकाळी ११.०० वा. तीर्थक्षेत्र रामराव महाराज गड हेलिपॅड येथे आगमन व संत श्री सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती उत्सवानिमित्त बंजारा महामेळावा व भव्य रॅली स्पर्धा आणि बंजारा सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी १.३० वा. तीर्थक्षेत्र रामराव महाराज गड येथून हेलिकॉप्टरने जवाहरलाल नेहरू दर्डा हेलिपॅड, भारी, जि यवतमाळ कडे प्रयाण.

### आंतरजिल्हा दुचाकी...

पोलीस त्याचा शोध घेत आहेत. तपासात धक्कादायक माहिती समोर आली असून, ही टोळी दुचाकी चोरल्यानंतर नेकनूर येथील शेख आसेम याच्याकडे सुपूर्द करत असे. शेख आसेम हा अवघ्या दोन तासांत गाडीचे सर्व सुटे भाग करून तिची विल्हेवाट लावत असे. जप्त करण्यात आलेला मुद्देमाल बीड, छत्रपती संभाजीनगर, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील चोरीच्या गाड्यांचा असण्याची दाट शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. या कारवाईमुळे राज्यातील अनेक वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची चिन्हे आहेत.

### राजू कोळकरांची...

तपासी अधिकाऱ्यासह एकूण पाच साक्षीदारांची तपासणी केली. फिर्यादी, पंच साक्षीदार व तपासी अधिकारी यांच्या साक्षीवर सरकार पक्षाने आरोप सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. मात्र, सुनावणीदरम्यान साक्षीदारांच्या जबाबांतील विसंगती, स्वतंत्र साक्षीदारांचा अभाव, घटनास्थळ पंचनाम्यातील त्रुटी तसेच आरोपीविरुद्ध शंकातीत स्वरूपाचा ठोस पुरावा नसल्याचे निदर्शनास आले. *आरोपीतर्फे ॲड. योगेश टेकाडे यांनी प्रभावी उलटतपासणी व सखोल कायदेशीर युक्तिवाद सादर केला. त्यांना ॲड. वैभव होळकर व ॲड. मोनाली सोनवणे यांनी सहकार्य केले. बचाव पक्षाने फौजदारी न्यायशास्त्रातील मूलभूत तत्त्व,आरोप शंकातीत सिद्ध होणे आवश्यक आहे, यावर ठाम भर दिला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद व उपलब्ध पुरावे विचारात घेऊन मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश सौ. रेणुका सातव यांनी दिनांक ०५.०३.२०२६ रोजी निकाल देत आरोपी राजू कोळेकर यांची निर्दोष मुक्तता जाहीर केली. न्यायालयाने नमूद केले की, अभियोजन पक्ष आरोपीविरुद्धचा गुन्हा शंकातीत सिद्ध करण्यात अपयशी ठरला असून परिणामी आरोपीस मुक्त करण्यात येत आहे.

### गेवराईत कारची...

संबंधित घटनेची नोंद पोलिसांत करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. संतोष पाचपुते यांच्या अकाली निधनाने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात आई-वडील, भाऊ, चुलता-चुलती, पत्नी व दोन मुले असा परिवार आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात...

### सईदा बानो वय वर्षे ४ हिचा पहिला रोजा(उपवास) पुर्ण



**मालेगाव । प्रतिनिधी**

मुस्लिम समाजाच्या पवित्र रमजान महिन्याचे जवळपास अर्धे पर्व संपत आलेले असुन थोरांबरोबरच लहांगे बाल गोपाल सुद्धा रमजानचे पवित्र व कठोर आसनारे(रोजा) ऊपावस पुर्ण करत असल्याचे दिसुन येत आहे. मालेगाव(नाशिक) येथील सईदा बानो सज्जाद अली, वय वर्षे ४ ह्या चिमुकलीने आयुषातील पहिला रोजा(उपवास) नुकताच पुर्ण केल्यामुळे परिवारातील नातेवाईक, आपेष्ट, हितचिंतकांकडुन सईदा या चिमुकलीचे कौतुक करण्यात येत असुन समाजातील थोर मोठ्यांकडुन या मुलीला दुवॉ (आशीर्वाद) देण्यात येत आहे.

### सौ. के. एस. के. महाविद्यालयातील गृहशास्त्र विभागात पर्यावरणपूरक होळी रंग प्रात्यक्षिक व प्रदर्शन



**बीड । प्रतिनिधी**

येथील सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू, कला विज्ञान वाणिज्य् महाविद्यालयातील गृहशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक २८.०२.२०२६ होळी सणाचे औचित्य साधून पर्यावरणपूरक होळीचे रंग बनवून ते विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकातून दाखवण्यात आले. बाजारात अनिर्बंध घातक रसायने वापरून तयार केलेले होळीचे रंग मिळतात, त्यामुळे बऱ्याच वेळा त्याचे डोळ्यावर, त्वचेवर किंवा वर घातक परिणाम होऊन शरीरावर त्याचे घातक परिणाम दिसून येतात. त्यामुळे आपल्या निसर्गातून शरीराला उपयुक्त असणारे पाने, फुले, फळे यांचा वापर करून नैसर्गिक रंग कसे बनवायचे याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. यामध्ये बीटरूट, झेंडू फुले, गुलाब, जरबेरा, पालक पाने, हळद, कोळसा या निसर्गनिर्मित वस्तू शरीरासाठी उपयुक्त व नैसर्गिक सामुग्रीचा वापर करून विद्यार्थ्यांना कोरडे रंग व ओले रंग यांचे प्रात्यक्षिक करून पर्यावरणपूरक होळीचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. यावेळेस पिंगळे पब्लिक स्कूल, बीड येथील विद्यार्थ्यांनी सुद्धा या प्रदर्शनाला भेट देऊन व माहिती करून घेतली. या प्रदर्शनास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे यांनी प्रत्यक्ष सर्व रंगांची माहिती घेऊन गृहशास्त्र विभागाचे कौतुक केले. या प्रदर्शनास डॉ. गाडेकर, डॉ. ससाणे, डॉ. इरलापल्ले डॉ. ज्योती क्षीरसागर यांनी भेट देऊन रंगांची माहिती घेतली. हे नैसर्गिक रंगांची रंगनिर्मिती गृहशास्त्र विभागप्रमुख डॉ. वंदना फटाले, प्रा. शाम कुरे, डॉ. दादासाहेब खोगरे यांनी परिश्रम घेतले व नैसर्गिक रंगांबद्दल व त्याचे आरोग्यदायी फायदे सर्वांना माहिती करून दिली.

### हाळम येथे आज स्वामी डॉ. तुळशीराम गुट्टे महाराजांचे कीर्तन



**परळी । प्रतिनिधी**

तालुक्यातील हाळम येथे दिनांक २८ तारखेपासून अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला प्रारंभ झाला असून ग्रामस्थांच्या भव्य नियोजनातून आणि आध्यात्मिक वातावरणात हा सोहळा हाळम नगरीत उत्साहात सुरू आहे. सप्ताहामध्ये दररोज दुपारी ज्ञानेश्वरी भावकथा निरूपण तर सायंकाळी भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कीर्तन महोत्सवात आज शुक्रवार दि.६ रोजी नाशिक येथील प्रसिद्ध कथाकार, कीर्तनकार तसेच संत साहित्यिक ह.भ.प स्वामी डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज यांच्या जागराच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. गुट्टे महाराज हे संत साहित्यातील गाढे अभ्यासक म्हणून ओळखले जातात. त्यांनी ओंकारेश्वर दर्शन, शंकराचे बिल्वदल, श्री गणेश स्तुती, सार्थ गणेश स्तुती, यशस्वी जीवनाचा मार्ग, मुक्ताई झाली प्रकाश, संत केदारी महाराजांची पंचक्रोशीतील महती, संत मुक्ताई पालखी सोहळा, जीवन सार सूत्र, द पाथवे टू अ सक्सेसफुल लाईफ, मनोविश्वाचा आध्यात्मिक प्रवास अशी अनेक पुस्तके प्रकाशित केली असून समाज, अध्यात्म आणि आत्मविकास क्षेत्रातील त्यांच्या कार्याची ती साक्ष आहेत. तसेच विविध दैनिकांमधून त्यांचे नियमित लेखन सुरू असून त्यांच्या विचारांना वाचकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. आदिशक्ती संत मुक्ताई आणि ज्ञानेश्वरी भावकथा निरूपण या विषयांवर डॉ. गुट्टे महाराज यांची महाराष्ट्रभर कथा निरूपणाची सेवा सातत्याने सुरू असते. या कीर्तन महोत्सवाच्या पर्वाला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून डॉ. गुट्टे महाराज यांच्या अमृतवाणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त ग्रामस्थ तसेच अखंड हरिनाम सप्ताह संयोजन समिती हाळम यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा-1

# सरपंचांचा सक्रीय सहभाग आवश्यक: जिल्हाधिकारी स्वामी

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा -१ अंतर्गत जिल्ह्यात राबविण्यास येत्या ७ तारखेपासून सुरुवात होत आहे. शिबीराचा अंतिम उद्देश हा ग्रामस्थांना सेवा देणे हा असून त्यासाठी सरपंचांचा सक्रीय सहभाग आवश्यक आहे,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी जिल्ह्यातील सरपंचांना केले. यावेळी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनीही सरपंचांशी दुरदृष्यप्रणालीद्वारे संवाद साधला. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा -१ जिल्ह्यात ८४ मंडळस्तरावर दि.७ ते १४ मार्च व एप्रिल महिन्यात १० ते १७ एप्रिल या कालावधीत तर नगरपालिकास्तरावर ८ ते १५ मे दरम्यान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने आज जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींच्या सरपंचांशी व ग्रामस्तरीय अधिकाऱ्यांशी दुरदृष्यप्रणालीद्वारे संवाद साधण्यात आला. निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यावेळी



उपस्थित होते.

विभागीय आयुक्त पापळकर यांनी सरपंचांना या शिबिरांमध्ये सक्रीय सहभाग देण्याचे आवाहन केले. गावातील एकल महिला वा तत्सम गरजू निराधार व्यक्तिंना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, गावातील पाणंद रस्ते, प्रलंबित फेरफार, अभिलेख दुरुस्ती, ७/१२ नोंदी दुरुस्ती, महसूली कायद्यांची जनजागृत व अंमलबजावणी, दाखले वाटप, तुकडे बंदी, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजूरी अशा विविध सेवांचे लाभ गोरगरिबांना देण्यात यावे,असेही आवाहन त्यांनी केले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले की, या शिबिरात आरोग्य तपासणी, योजनांची जनजागृती अशा बाबींचाही समावेश करावा. अधिकाधिक गरजूंनालाभ मिळावा यासाठी सरपंचांनी आपले सक्रीय योगदान द्यावे,असे आवाहन त्यांनी केले.

जिल्ह्यातील ९ तालुके, ८४ मंडळ, ५०० सजा व १३६९ गावांमध्ये हे अभियान राबविण्यात येणार असून सर्व मिळून ८४ शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

शिबिरांचे वेळापत्रक या प्रमाणे-

दि.७ मार्च रोजी - भावसिंगपूरा अपर तहसिल, शेकटा ता. छत्रपती संभाजीनगर, निजलगाव ता. पैठण, वडोदबाजार ता. फुलंब्री, वेरुळ ता. खुलताबाद, चिंचोली ता. कन्नड, शिवना ता. सिल्लोड, जरंडी ता. सोयगाव, तुर्काबाद ता. गंगापूर, खंडाळा ता. वैजापूर.

दि.१० मार्च रोजी - आपेगाव ता. पैठण, नाचनवेल ता. कन्नड, गोळेगाव बु. त. सिल्लोड, शेंदूरवादा ता. गंगापूर, शिऊर ता. वैजापूर.

दि.१४ मार्च रोजी - चौका ता. छत्रपती संभाजीनगर, ढोरकीन ता. पैठण, पिरबावडा ता. फुलंब्री, चापानेर ता. कन्नड, अजिंठा ता. सिल्लोड, बनोटी ता.सोयगाव, वाळूज ता. गंगापूर, गारज ता. वैजापूर.

दि.२४ मार्च रोजी - करमाड ता. छत्रपती संभाजीनगर, पिंपळवाडी ता. पैठण, चिकलठाण ता. कन्नड, पालोद ता. सिल्लोड, आसेगाव ता. गंगापूर, लासूरगाव ता. वैजापूर.

दि.३० मार्च रोजी- कचनेर ता. छत्रपती संभाजीनगर, नादर ता. पैठण, उंडणगाव ता. सिल्लोड, डोणगाव ता. गंगापूर, लोणी खु. वैजापूर.

दि.१० एप्रिल रोजी- कांचनवाडी, अपर तहसिल, वरुड काजी ता. छत्रपती संभाजीनगर, बिडकीन ता. पैठण, आळंद ता. फुलंब्री, बाजारसावंगी ता. खुलताबाद, पिशोर ता. कन्नड, निल्लोड ता. सिल्लोड, सावळदबारा ता. सोयगाव, हर्सूल ता. गंगापूर, जानेफळ ता. वैजापूर.

दि.१७ एप्रिल रोजी- पंढरपूर अपर तहसिल, चित्ते पिंपळगाव ता. छत्रपती संभाजीनगर, बालानगर ता. पैठण, बाबरा ता. फुलंब्री, सुलतानपूर ता.खुलताबाद, करंजखेडा ता. कन्नड, भराडी ता.सिल्लोड, सिद्धनाथ वडगाव ता. गंगापूर, महालगाव ता. वैजापूर.

दि.२३ एप्रिल रोजी- लोहगाव ता. पैठण, देवगाव रंगारी ता. कन्नड, आमठाणा ता.सिल्लोड, गाजगाव ता.गंगापूर, बोरसर ता. वैजपुर.

दि.३० एप्रिल रोजी- लाडसावंगी ता. छत्रपती संभाजीनगर, आडूळ ता. पैठण, हतनूर ता. कन्नड, अंभई ता. सिल्लोड, भेंडाळा ता. गंगापूर, नागमठाण ता.वैजापूर.

## अंबाजोगाई येथे ११०० खाटांचे नवीन रुग्णालय उभारणार: वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

**मुंबई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथे ११०० खाटांचे अत्याधुनिक शासकीय रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून या नवीन रुग्णालयाच्या उभारणीमुळे परिसरातील नागरिकांना अधिक दर्जेदार व आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या प्रकल्पाचे काम लवकरच सुरू करण्यात येणार आहे, त्यासाठी सुमारे १०२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असल्याची माहिती



वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी विधानपरिषदेत दिली. नियम ९२ अन्वये अर्धा तास चर्चेत सदस्य विक्रम काळे यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला. याला उत्तर देताना मंत्री हसन मुश्रीफ बोलत होते. मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आवश्यक तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती, अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करून देणे तसेच उपचार सुविधा वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या रुग्णालयातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करून आरोग्य सुविधांचा विस्तार करण्यात येणार आहे. रुग्णालयात सध्या पूर्णवेळ कार्डिओलॉजिस्ट नसल्यामुळे हृदयविकार उपचारांमध्ये अडचणी येत आहेत. त्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात सर्जनची नियुक्ती करण्यात आली असून लवकरच पूर्णवेळ कार्डिओलॉजिस्ट उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच एंजिओग्राम मशीनच्या साहाय्याने एंजिओग्राफीसारख्या सेवा सुरू आहेत भविष्यात या सेवांचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.याशिवाय कॅन्सर उपचारांसाठी आवश्यक सुविधा उभारण्याचे कामही सुरू असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



*लोकप्रिय व्याख्याते ,छत्रपती शिव-शंभु चरित्राचे अभ्यासक प्रा.नितीन बानुगडे पाटील सर यांनी श्री. राहुलजी गिरी व्याख्याते यांच्या निवासस्थानी भेट दिली. सौं.गिरी सुधर्मा उभयतांनी परिवाराच्या वतीने त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या.*

## यावर्षी गव्हाचे मिळणार बंपर उत्पादन; शेतकऱ्याला लागली आशा

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

बीड तालुक्यात चालू रब्बी हंगामामध्ये गहू पिकाखालील क्षेत्र वाढलेले आहे. त्यातच पोषक हवामानामुळे पीकही जोमदार आले आहे. त्यामुळे यंदा गव्हाचे बंपर उत्पादन निघण्याची शक्यता दिसुन येत आहे. त्यामुळे पिंपळनेर सह परिसरात गहू पिकाच्या काढणीसाठी हरियाणा, पंजाब राज्यातून दाखल झालेली कम्बाईन हार्वेस्टर यंत्रे दाखल झाली आहेत. या हंगामात,पिंपळनेर, ईट, नाथापूर, वडगाव, गुंदा, नाळवंडी, रंजेगाव,जवळा आडगाव , ताडसोन्ना, घाटसावळी, मन्यारवाडी आदी गावात सुमारे १ हजार ८५६ हेक्टरवर गव्हाची पेरणी झाली आहे. यातील बहुतांशी शेतकऱ्यांनी एचडी २१८९,तसेच लोक-१ या वाणास ही पसंती दिली आहे. सध्या येथील गहू काढणीस फारसा वेग आला नसला तरी ठिकठिकाणच्या रस्त्यावर हार्वेस्टर यंत्रे उभी असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. यावर्षी रब्बी हंगामातील पोषक वातावरणामुळे गहू पीक जोमदार आलेले आहे. परिणामी चालू वर्षी मुबलक प्रमाणावर गव्हाचे उत्पादन येणार आहे. त्यामुळे गव्हाचे दर फारसे तेजीत राहणार नाहीत, अशी चर्चा व्यापाऱ्यांमध्ये असल्याचे दायमा श्यामसुंदर यांनी सांगितले. अनेक शेतकऱ्यांनी गव्हाचे पीक ऊस व फळबागांमध्येही घेतले असल्याचे दिसून येत आहे. कम्बाईन हार्वेस्टरयंत्राद्वारे अवघ्या तास-दीड तासात गव्हाची काढणी-मळणी होते. त्यामुळे गेल्या ३ दशकांपासून शेतकऱ्यांना गहू पीक घेणे सोयीचे झाले आहे.दरम्यान, हार्वेस्टर यंत्राद्वारे काढणी-मळणीसाठी एक एकर क्षेत्रासाठी सुमारे अडीच हजार रुपये दर घेतला जात असल्याचे सांगण्यात येत आहे. हा दर वेगवेगळ्या भागांमध्ये कमी-जास्त होत असल्याचेही सांगण्यात आले, तर गव्हाची एकरी सरासरी २० क्विंटलपेक्षा अधिक उत्पन्न मिळेल, असेही ठोकरे श्रीकांत पिंपळनेर या शेतकऱ्यांने सांगितले.



*माजलगाव येथे कन्यादान मंगल कार्यालय येथे आढाव व गोरे विवाह सोहळा प्रसंगी शुभ आशीर्वाद देण्यासाठी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सुभाष भाऊ राऊत व संतोष रासवे भगवान बप्पा आढाव बाबासाहेब आढाव महादेव नाना आढाव अनंत आढाव मच्छिंद्र आढाव तुकाराम आढाव व इतर*


### जाहिर प्रगटन

**मा. श्री. कृष्णराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १२६/२०२६**

**सुमन गंगावणे वि. निल**

मागणी : बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत

अर्जदारः १) सुमन भ्र. नायबराव उर्फ नायबा गंगावणे, वयः ७५वर्षे, धंदा घरकाम, २) रेवनाथ पि. नायबराव उर्फ नायबा गंगावणे, वय: ३९ वर्षे, धंदा: नौकरी, ३) शिवनाथ पि. नायबराव उर्फ नायबा गंगावणे, वय: ३५वर्षे, धंदा शेती, ४) मुरली पि. नायबराव उर्फ नायबा गंगावणे, वय: ३३ वर्षे, धंदा: नौकरी, सर्व रा. जुजगव्हाण, ता. जि. बीड

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यानी या न्यायालयात याचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी **मयत नामे नायबराव उर्फ नायबा भानुदास गंगावणे, राहणार जुजगव्हाण, ता. जि. बीड हे दिनांक २१/०५/२०२४ रोजी जुजगव्हाण ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत. मयताचे आई वडील पुर्वीच मत झालेले आहेत.

मयत नामे नायबराव उर्फ नायबा भानुदास गंगावणे, यांचे निधन झालेले आहे मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते को, सदरह अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर तरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह कोर्ट सदर अर्जदार हा हक्काबद्दल लागलीच पुरावा व त्याचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत नायबराव उर्फ नायबा भानुदास गंगावणे यांचे वारस असल्याबाबत प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०४/०३/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०६/०४/२०२६ आहे.

**(विधीज्ञ श्री. गणेश शिंदे)**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर बीड**



**अवसायक (Liquidator)**

**श्री साईराम अर्बन मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि.बीड तथा उपनिबंधक, सहकारी संस्था ता.बीड**

**Email Id- liquidatorsairammultistate@gmail.com**

जा.क्र. /अवसायक/साईराम मल्टीस्टेट/ पदभरती /2026 — दि. 05/03/2026

श्री साईराम अर्बन मल्टिस्टेट को ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी लि.बीड (अवसायनात ) या संस्थेमध्ये तात्पुरत्या स्वरूपात खालीलप्रमाणे रिक्त जागा भरणे आहे

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | शैक्षणीक पात्रता |
|---|---|---|---|
| 1 | लिपिक | 03 | कोणत्याही शाखेचा पदवीधर तसेच संबंधित कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव आवश्यक |

इच्छुक उमेदवारांनी दिनांक 12 /03/2026 रोजी अवसायक, श्री साईराम अर्बन मल्टिस्टेट को ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी लि.बीड (अवसायनात ) तथा उपनिबंधक,सहकारी संस्था तालुका बीड यांचे कार्यालय, सहकार शक्ती इमारत,जालना रोड बीड येथे सकाळी 11:00 ते दुपारी 02:00 वाजेपर्यंत या वेळेत आपल्या मूळ कागदपत्रासहित मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

Shri Sairam Urban Multistate Coop.Credit Society Ltd.Beed And Deputy Registrar, C.S.Tq.Beed — Under Liquidation Reg.No.MSCS/CR754/2013

**(एस.बी.घोडके)**
**अवसायक**
**श्री साईराम अर्बन मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि.बीड तथा उपनिबंधक, सहकारी संस्था ता.बीड**

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शुक्रवार दि. ०६ मार्च २०२६ •

## थोडक्यात...

### बलभीम अंधारे यांचे अल्पशा आजाराने निधन



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तालुक्यातील अंबासाखर कारखाणा येथील रहिवाशी बलभीम गुलाब अंधारे वय ४६वर्ष यांच्यावर स्वाराती रुग्णालयात उपचार सुरु आसताना अल्पशा आजाराने रविवारी सायंकाळी ६ वाजता प्राणज्योत मावळली. त्यांच्यावर सोमवारी सकाळी ११ वाजता नंदडी येथील स्मशानभुमीत दफनविधीने अंत्यसंस्कार भाच्चा रोहीत अंधारे याच्या हस्ते करण्यात आले.यावेळी पंचक्रोशीतील बहुसंख्य नागरीकांची उपस्थिति होती.त्यांच्या पश्चात पत्नी सारिका अंधारे, मुलगी ओमिना अंधारे,दोन बहीण लैला अंधारे,प्रिया अंधारे या आसुन रोहीत अंधारे यांचे ते मामा होते.

### जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कडा नं. १ मध्ये भरला आनंदी बाजार



**कडा । प्रतिनिधी**

कडा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कडा नंबर १ येथे आज दिनांक ५ मार्च गुरूवार रोजी सकाळी आनंदी बाजार भरवण्यात आला. या बाजाराचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष योगेश कर्डिले यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांना नफा – तोटा, शिका व कमवा तसेच व्यवसाय व व्यवहाराची माहिती व्हावी यासाठी हा आनंदी बाजार भरवण्यात आला असे शाळेचे मुख्याध्यापक उद्धव सोनवणे सरांनी सांगितले.या बाजारात विद्यार्थ्यांनी खाद्य पदार्थ सह इतर वस्तूंचे स्टॉल लावले होते. यात पाणीपुरी,भेळ, गुलाबी जामुन, इडली,भजे वडापाव, समोसे, कचोरी,पॅंटीस, मसाला ताक,कुल्फीसह पालेभाज्या, हरभरा,वांगी,बटाटे,टोमॅटो पालक,मेथी,गाजर,कांदे, पपई,टरबुज,चिकू सह आदी स्टॉल लागले होते. मुलांना व्यवहारी ज्ञान,नफा – तोटा, गणित हिशोबाचे ताळमेळ हे कौशल्य विद्यार्थ्यांना या आनंदी बाजारच्या माध्यमातून शिकण्यास मिळते. या आनंदी बाजारासाठी शाळेचे शिक्षक शिक्षिका,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य विद्यार्थी पालक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयातील डॉ मुजावर एस.टी यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या वतीने विद्यावाचस्पती पी.एचडी डिग्री प्रधान



**नेकनूर । प्रतिनिधी**

प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय नेकनुर येथील हिंदी विभाग प्रमुख डॉ मुजावर एस.टी. त्यांनी दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी उस्मानाबाद जिले के मुस्लिम लोकगीतों का अध्ययन या विषयावर त्यांनी आपला शोध प्रबंध विद्यापीठात सादर केलेल्या प्रबंधास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर यांनी हिंदी विषयात त्यांना विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवी प्रदान केली. त्यानिमित्त महाविद्यालयात आज त्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डि. के . हे अध्यक्षस्थानी होते तर आयक्यूसी समन्वयक डॉ. मकबुल सलीम हे व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. मुजावर एस.टी. यांनी म्हणाले की, उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये मला आठ तालुक्यामध्ये जाऊन सर्वे क्षण करावे लागले. त्यातून मला लोकगीत संकलन केले आणि हे लोकगीत संकलन आज माझ्यासाठी नव्हे तर मराठवाड्याच्या मुस्लिम समाजासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. भविष्यात संशोधन करणाऱ्यास व मुस्लिम समाजालाही माझ्या संशोधनाचा निश्चितच फायदा होईल. मला माझ्या या संशोधनासाठी माझे शोध निर्देशक प्रो. डॉ.सय्यद शौकतअली हिंदी विभाग प्रमुख जय भवानी कला विज्ञान महाविद्यालय पाटोदा. यांचे मार्गदर्शन लाभले.

# गडकोट विकास महामंडळाच्या मागणीसाठी किसन पाटील यांचे आमरण उपोषण

**बीड । प्रतिनिधी**

स्वराज्यातील गडकिल्ले, मावळ्यांच्या समाध्या व ऐतिहासिक स्थळांच्या संवर्धनासाठी स्वतंत्र गडकोट विकास महामंडळ स्थापन करण्याच्या मागणीसाठी जागर प्रतिष्ठानच्या वतीने दि. ५ मार्च २०२६ रोजी तुळजापूर येथे आमरण उपोषण सुरू करण्यात आले. या उपोषणाचे नेतृत्व जागर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन प्रभाकर चव्हाण करत आहेत.

महाराष्ट्राची पवित्र भूमी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाने आणि छत्रपती संभाजी महाराज तसेच असंख्य मावळ्यांच्या बलिदानाने गौरवलेली आहे. स्वराज्याच्या इतिहासाची साक्ष देणारे गडकिल्ले आज दुर्लक्षित अवस्थेत असल्याने त्यांचे तातडीने संवर्धन करणे गरजेचे असल्याचे चव्हाण यांनी सांगितले.




या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने स्वराज्यातील गडकिल्ले, मावळ्यांच्या समाध्या, जन्मस्थळे व ऐतिहासिक घटनांची साक्ष देणारी स्थळे जतन करण्यासाठी स्वतंत्र गडकोट विकास महामंडळ स्थापन करावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. तसेच गडकिल्ल्यांवरील अतिक्रमणे हटविणे, प्रत्येक गडावर कायमस्वरूपी भगवा ध्वज बसविणे, शिवराज्याभिषेक सोहळा १६७४ दिनी प्रत्येक गडावर शासकीय पातळीवर स्वराज्य ध्वज फडकविणे आणि गडकिल्ले व महापुरुषांच्या नावाचा वापर दारूच्या दुकानांसाठी बंद करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

या मागण्यांसाठी किसन प्रभाकर चव्हाण हे दि. ५ मार्च रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक तुळजापूर येथे आमरण उपोषणास बसले असून शासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## बीड शहरातील मुख्य बाजारपेठेतील रस्त्यांची दुरवस्था

### कारंजा टॉवर ते कब्बाड गल्ली मार्गे माळीवेस व माळीवेस ते बलभीम चौक मार्गे कारंजा टॉवर या मार्गांचे सिमेंटिकरण तात्काळ करण्यात यावे : गुरखुदे, देशपांडे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराचे हृदय समजल्या जाणाऱ्या कारंजा टॉवर ते माळीवेस आणि बलभीम चौक परिसरातील रस्त्यांची गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत दुरवस्था झाली आहे. अनेक महिन्यांपासून स्थानिक नागरिकांनी वारंवार निवेदने देऊनही नगरपरिषद प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसून आले आहे. कारंजा टॉवर ते पिंगळे गल्ली, जुनी भाजी मंडई, शहर पोलिस स्टेशन, कबाड गल्ली ते माळीवेस आणि माळीवेस, धोंडीपुरा, बलभीम चौक ते कारंजा टॉवर या वर्दळीच्या



मार्गांचे डांबरीकरण/सिमेंटिकरण तात्काळ करण्यात यावे. या संदर्भात मुख्यमंत्र्यांकडे किंवा संबंधित नगरविकास विभागाकडे विशेष पाठपुरावा करण्याची मागणी नगरसेवक जगदीश गुरखुदे आणि भाग्यश्री देशपांडे यांनी निवेदनाद्वारे मुख्याधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. हा भाग मुख्य बाजारपेठेचा असल्याने येथे मोठी वर्दळ असते. मात्र, रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे दुचाकीस्वार घसरून पडण्याचे प्रमाण वाढले आहे. धुळीमुळे व्यापाऱ्यांच्या मालाचे नुकसान होत असून, पावसाळ्यात या भागाला 'खड्ड्यांचे साम्राज्य' असे स्वरूप येते. आम्ही २०२२ पासून सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा करत आहोत. निवेदने देऊनही केवळ आश्वासने मिळतात, प्रत्यक्षात काम शून्य आहे. आता तरी शासनाने कोणत्याही योजनेतून हा निधी मंजूर करून रस्ते मार्गी लावावेत अशी मागणी गुरखुदे आणि देशपांडे यांनी केली आहे.

## सौ. के.एस. के महाविद्यालयात गझल गायनाचा कार्यक्रम संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू, कला, विज्ञान व वाणिज्य् महाविद्यालय बीड येथे संगीत विभागाच्या वतीने मराठी हिंदी गझल गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात सर्वप्रथम नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव मा. दीपाताई क्षीरसागर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.अनिता शिंदे , कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. ए. एस. खान या मान्यवरांच्या हस्ते काकू– नाना यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मा. दीपाताई क्षीरसागर यांनी दीप प्रज्वलन करून पुढील गझल गायन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

## उद्योगविश्वात आदित्य पॉलिटेक्निकची दमदार झेप; विद्यार्थ्यांची अभ्यासपूर्ण औद्योगिक मोहीम

### वीज निर्मितीची प्रक्रिया, कच्च्या मालापासून अंतिम उत्पादनासह विद्यार्थ्यांनी औद्योगिक सुरक्षिततेचे नियम घेतले जाणून

**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांची अभ्यासपूर्ण औद्योगिक मोहीम तांत्रिक शिक्षणाला उद्योग क्षेत्राची प्रत्यक्ष जोड देण्याच्या उद्देशाने बीड येथील आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्युत अभियांत्रिकी विभागामार्फत जयसिंगपूर व शिरोळ (जि. कोल्हापूर) येथे औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व उद्योगातील आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला. या भेटीत विद्यार्थांनी वीज निर्मितीची प्रक्रिया, कच्च्या मालापासून



अंतिम उत्पादनासह औद्योगिक सुरक्षिततेचे नियम जाणून घेतले.

औद्योगिक भेटीची संकल्पना संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आली. विद्यार्थ्यांनी श्रीराम इलेक्ट्रिकल लिमिटेड, जयसिंगपूर येथे कॅपॅसिटर निर्मिती प्रक्रियेचे सखोल निरीक्षण केले. कच्च्या मालापासून अंतिम उत्पादनापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया, गुणवत्ता तपासणी पद्धती, विविध तांत्रिक चाचण्या, औद्योगिक सुरक्षिततेचे नियम यांची माहिती

> **विद्यार्थ्यांनी उद्योगातील प्रत्यक्ष अनुभव घेतल्यास त्यांची संकल्पना अधिक स्पष्ट होते. त्यांचा आत्मविश्वास वाढतो. त्यामुळे अशा प्रकारचे उद्योगाभिमुख उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. –डॉ. आदित्य सारडा, संचालक आदित्य शिक्षण संस्था, बीड**

तज्ज्ञांकडून देण्यात आली. विद्यार्थ्यांना पॉवर फॅक्टर सुधारणा, रिऍक्टिव्ह पॉवर व्यवस्थापनाचे महत्त्व प्रत्यक्ष उदाहरणांसह समजावून सांगण्यात आले.

यानंतर विद्यार्थ्यांनी वसंत इलेक्ट्रिकल ट्रान्सफॉर्मर मॅन्युफॅक्चरिंग लिमिटेड येथे ट्रान्सफॉर्मर कोअर असेंब्ली, एलव्ही व एचव्ही वाइंडिंग, व्हॅक्युम ऑईल फिलिंग प्रक्रिया, इन्सुलेशन तंत्रज्ञानाचा अभ्यास केला. टेस्टिंग लॅबमध्ये शॉर्ट सर्किट टेस्ट, रेशो टेस्ट, इन्सुलेशन रेसिस्टन्स टेस्ट यांचे प्रात्यक्षिक पाहिले. विद्यार्थ्यांचा तांत्रिक आत्मविश्वास वाढला. तिसऱ्या टप्प्यात विद्यार्थ्यांनी श्रीदत्त पावर प्लांट, शिरोळ येथे को-जनरेशन पद्धतीद्वारे वीज निर्मितीची संपूर्ण साखळी समजून घेतली. बॉयलरमधील वाफ निर्मिती, टर्बाईनची कार्यप्रणाली, जनरेटर समक्रमण, कंट्रोल रूममधील डिजिटल मॉनिटरिंग प्रणालीचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात आले. उद्योगातील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. करिअर संधी, शिस्त, वेळेचे व्यवस्थापन, सुरक्षिततेचे महत्त्व अधोरेखित केले. या औद्योगिक भेटीस संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा, प्राचार्य डॉ. राहुल खडके, विभागप्रमुख प्रा. जाधव डी.एम. तसेच प्रा. शहाणे एस.बी., प्रा. कांबळे पी.व्ही. व प्रा. वीर ए.एम. यांचे मार्गदर्शन लाभले.

## गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतन निमित्त आरोग्य सप्ताहाचे आयोजन

- गुरुपुत्र युवासंत चंद्रकांत मोरे यांची प्रमुख उपस्थिती
- १० मार्च रोजी मोफत आरोग्य तपासणी व ऑपरेशन शिबीर

**माजलगाव । प्रतिनिधी**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर चे पीठाधीश परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतन निमित्त दि. ५ ते १२ मार्च २०२६ दरम्यान आरोग्य सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या आरोग्य सप्ताहामध्ये मोफत आरोग्य तपासणी, नाडी परीक्षण शिबीर आयोजित करण्यात आले आहे. मोफत आरोग्यसेवा देण्यासाठी सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर येथील डॉ शेवाळे, डॉ जयेश पाटील उपस्थित राहणार आहेत. दि. १० मार्च रोजी परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अड कॅन्सर रिसर्च सेंटर माली पारगाव येथे होणाऱ्या महा आरोग्य शिबिराच्या उदघाटन प्रसंगी गुरुपुत्र युवासंत आदरणीय चंद्रकांत (दादासाहेब) मोरे उपस्थित राहणार आहेत. यावेळी महा सत्संग आरोग्य मेळाव्यातून चंद्रकांत मोरे यांचे अमृततुल्य हितगुज, आरोग्य, अध्यात्मिक, सामाजिक, धार्मिक इत्यादी विषयांव अनमोल मार्गदर्शन लाभणार आहे. यानंतर याठिकाणी कॅन्सर, हार्निया, गर्भाशयाचे आजार, पित्ताशयाचे, हायड्रोसील, अपेंडिक्स, अन्जियोप्लास्टी, हाडांच्या शस्त्रक्रिया, सांधे विकार, पंचकर्म, फिजिओथेरपी, वात, कफ, पित्त, अर्धांगवायू, मनक्याचे विकार, कान, नाक व घसा, मधुमेह, रक्तदाब, यासह सर्व आजारांची तपासणी केली जाणार असून, आयुष्मान भारत या योजनेत पात्र असणारे रुग्णांचे मोफत ऑपरेशन करून दिले जाणार आहेत.व पात्र नसलेल्या परंतु शस्त्रक्रियेची आवश्यकता असणाऱ्या रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया करून दिली जाईल मेडिकलचा व लॅबचा खर्च वैयक्तिक करावा. माजलगाव तालुक्यातील सर्व ठिकाणी होणाऱ्या मोफत आरोग्य तपासणी शिबीरांचा बीड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर व समस्त श्री स्वामी समर्थ सेवेकरी परिवाराने केले आहे.

## पाटोदा सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचा अभिनव उपक्रम

### सहभागी शाळांना ३२ इंची एलईडी टीव्ही भेट

**पाटोदा । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये परिसरातील अनेक शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. विद्यार्थ्यांमध्ये शिवचरित्राबद्दल जागृती व्हावी, तसेच त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमांमध्ये एकूण १३ शाळांनी सहभाग घेतला होता. सहभागी झालेल्या सर्व शाळांचा उत्साह वाढवण्यासाठी



आणि त्यांच्या योगदानाची दखल घेण्यासाठी शिवजयंती उत्सव समितीने अभिनव उपक्रम राबवत प्रत्येक शाळेला ३२ इंची एलईडी टीव्ही बक्षीस स्वरूपात देण्याचा निर्णय घेतला.समितीच्या पदाधिकाऱ्यांनी स्वतः संबंधित शाळांना भेट देत या टीव्हींचे वितरण केले. या उपक्रमामुळे शाळांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थ्यांना शैक्षणिक व्हिडिओ, डिजिटल शिक्षण तसेच विविध माहितीपर कार्यक्रम पाहण्यासाठी आधुनिक साधन उपलब्ध झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला निश्चितच चालना मिळणार असल्याचे शिक्षकांनी सांगितले.शिवजयंती उत्सव केवळ साजरा न करता त्यातून समाजोपयोगी उपक्रम राबवण्याचा समितीचा हा प्रयत्न सर्व स्तरातून कौतुकास्पद ठरत आहे.सहभागी सर्व १३ शाळांच्या मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांनी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे मनापासून आभार व्यक्त केले असून भविष्यातही अशा उपयुक्त उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.